महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
शिवाजी विद्यापीठ रोड, विद्यानगर, कोल्हापूर – ४१६००४
दूरध्वनी क्र. ०२३१-२५२१०३८, २५३१०३८,२५२१०१६
E-mail : gpkolhapur@yahoo.com Website : www.gpkolhapur.org.in
. AICTE Permanent ID : 1-475576863 . DTE Code : 6010 . MSBTE Code : 0011 . Est. Year : 1961

जा.क्र.शातंनिको/शै.समन्वयक/FY Notice/ 341 दिनांक : 23 जुलै २०२६.

## शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये प्रथम वर्ष प्रवेशित डिप्लोमा विद्यार्थ्यांसाठी सूचना

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील नव्याने प्रवेशित **प्रथम वर्ष डिप्लोमा विद्यार्थ्यांचे विषम सत्र** दिनांक **३ ऑगस्ट २०२६** पासून सुरू होत आहे.

**शैक्षणिक दिनदर्शिका (Academic Calendar)** संस्थेच्या संकेतस्थळावर (**www.gpkolhapur.ac.in**) तसेच संबंधित विभागाच्या सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सर्व नव्याने प्रवेशित प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी **दिनांक ३ व ४ ऑगस्ट २०२६** रोजी आयोजित करण्यात आलेल्या **Student Induction Programme साठी** उपस्थित राहणे अनिवार्य आहे. या कार्यक्रमामध्ये शैक्षणिक बाबी, संस्थेचे नियम, परीक्षा पद्धती, विद्यार्थी सहाय्य सेवा तसेच इतर महत्त्वाच्या बाबींची सविस्तर माहिती देण्यात येईल. या **कार्यक्रमाचे** सविस्तर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

वर्गांचे वेळापत्रक संबंधित विभागाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात आले आहे. सर्व विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार सर्व **सैद्धांतिक (Theory) तास** व **प्रात्यक्षिक (Practical) सत्रांना** नियमित उपस्थित राहणे अनिवार्य आहे. नियोजित तास किंवा प्रात्यक्षिकांच्या वेळेत वर्ग बुडवून संस्थेच्या परिसरात विनाकारण फिरू नये.

विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे आवश्यक उपस्थिती राखणे बंधनकारक आहे :

- **प्रात्यक्षिक सत्रांमध्ये १००% उपस्थिती.**
- **सैद्धांतिक तासांमध्ये किमान ७५% उपस्थिती.**

विहित उपस्थिती पूर्ण न झाल्यास विद्यार्थ्यांना **टर्म मंजूर केली जाणार नाही (Detention)** व त्यांना अंतिम सत्र परीक्षेस बसण्यास अपात्र ठरविण्यात येईल. परिणामी, विद्यार्थ्यांचे **संपूर्ण शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता** आहे.

सर्व विद्यार्थ्यांनी संस्थेतील शिस्त, सभ्य वर्तन आणि संस्थेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले **"Code of Conduct"** काळजीपूर्वक वाचून त्याचे पालन करावे.

(कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

प्रत: सर्व विभागप्रमुख

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्थापत्य | यंत्र | विद्युत | अणुविद्युत | माहिती व तंत्रज्ञान | धातूशास्त्र |
| विज्ञान व मानव्यशास्त्र | | उपयोजित यंत्र | परीक्षा विभाग | विद्यार्थी विभाग | |